# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः26.04.2025** **वारःशनिवार**

---

1. सिंधू जलवाटप करार स्थगित करण्याचा निर्णय पूर्णपणे न्यायसंगत आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणारा – अमित शहा यांची स्पष्टोक्ती,
2. भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना तातडीनं परत पाठविण्याच्या गृहमंत्रालयाच्या सर्व राज्यांना सूचना,
3. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरस्थ पद्धतीनं 51 हजारांहून अधिक युवकांना नियुक्तीपत्रांचं वितरण,
4. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल कुठलंही अवमानकारक वक्तव्य न करण्याची सर्वोच्च न्यायालयाची राहुल गांधी यांना ताकीद, आणि
5. इस्रोचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ वैज्ञानिक डॉक्टर के. कस्तुरीरंगन यांचं बंगळुरू इथं निधन.

**<u>शहा बैठक</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानबरोबरचा सिंधु जल वाटप करार स्थगित करण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे. या संदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्ली इथं एक उच्चस्तरीय बैठक घेतली. शहा यांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीला परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर, केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतानं सिंधू जलवाटप करार स्थगित करण्याचा घेतलेला निर्णय हा पूर्णपणे न्यायसंगत असून राष्ट्रहिताला प्राधान्य देणारा आहे. पाण्याचा एकही थेंब पाकिस्तानात पोहोचणार नाही याची खबरदारी यापुढे घेतली जाईल, असं शहा यांनी या बैठकीत सांगितलं.

**<u>शहा वापसी</u>**

दरम्यान, या बैठकीमध्येच भारतात आलेल्या, सध्या वास्तव्यास असलेल्या पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवून त्यांना तात्काळ परत पाठवण्यासाठी पावलं उचलण्याच्या सूचना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व राज्यांना दिल्या. या संदर्भात त्यांनी सर्व मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. काल नवी दिल्ली इथून 191 पाकिस्तानी नागरिकांची मायदेशी रवानगी करण्यात आली. दरम्यान, महाराष्ट्रातील पाकिस्तानी नागरिकांची यादी तयार झाली आहे. त्यांनी तात्काळ देश सोडावा यासाठी प्रयत्न केले जातील, दिरंगाई झाल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

**<u>मोहीम</u>**

पहलगामला झालेल्या दहशतवादी हल्ल्याची माहिती इतर राष्ट्रांना समजावी, या दृष्टीनं भारतानं एक व्यापक राजनैतिक मोहीम हाती घेतली आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दोन दिवसांपूर्वी काही देशांच्या राजदूतांना बोलावून या हल्ल्याची माहिती दिली होती. काल अमेरिका, इस्राएल आणि स्पेनच्या राजदूतांना बोलावून ही माहिती देण्यात आली.

**<u>पर्यटक</u>**

काश्मीरमध्ये गेलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना परत राज्यात आणण्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करत आहे. काल तिसऱ्या विशेष विमानातून 232 प्रवासी मुंबईत दाखल झाले. पहलगाम हल्ल्यानंतर आतापर्यंत सुमारे 800 पर्यटक महाराष्ट्रात परतले आहेत.

**<u>राहुल गांधी</u>**

पहलगाम इथल्या हल्ल्यानंतर केंद्र सरकारनं पाकिस्तानविरोधात जाहीर केलेल्या उपाययोजनांना काँग्रेसचा पाठिंबा आहे, याचा पुनरुच्चार विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काल केला. जम्मू काश्मीरच्या दौऱ्यावर असलेल्या गांधी यांनी काल प्रथम श्रीनगरमध्ये जम्मू

काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांची भेट घेतली. दहशतवादाचा कणा मोडून टाकण्यासाठी राज्य सरकारला आवश्यक ती सर्व मदत करण्याचं आश्वासन गांधी यांनी दिलं.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरस्थ पद्धतीनं विविध सरकारी विभाग आणि संघटनांमध्ये नवनियुक्त 51 हजारांहून अधिक युवकांना नियुक्तीपत्रांचं वितरण करणार आहेत. यावेळी मोदी नवनियुक्त कर्मचाऱ्यांना संबोधित करणार आहेत. रोजगार निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या पंतप्रधानांच्या वचनबद्धतेच्या अनुषंगानं देशभरात 47 ठिकाणी हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. यामुळे युवकांना त्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि राष्ट्रीय विकासात प्रभावी योगदान देण्यासाठी अर्थपूर्ण संधी उपलब्ध होतील. नवीन भरती केलेले कर्मचारी केंद्र सरकारमध्ये विविध मंत्रालयं आणि विभागांमध्ये रुजू होणार आहेत.

**ऊर्जामंत्री परिषद**

सिक्कीममधील गंगटोक इथं आज ईशान्येकडील ऊर्जामंत्र्यांची परिषद होत आहे. केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल या परिषदेत सहभागी होणार आहेत. ईशान्येकडील राज्यांचे सर्व ऊर्जामंत्री आणि वरिष्ठ अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. परिषदेत या भागातील वीज क्षेत्रातील विविध पैलूंवर चर्चा होणार आहे.

**गोयल**

'2047 पर्यंत विकसित भारताचं ध्येय गाठण्यासाठी पोलाद उद्योगानं पुढाकार घ्यावा', असं आवाहन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी केलं आहे. ते काल मुंबईत इंडिया स्टील 2025 या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि परिषदेत बोलत होते. स्टील उद्योग भारताच्या संकटात टिकून राहण्याच्या क्षमतेचं प्रतीक असावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सरकार अनेक विकसित देशांशी FTA, अर्थात मुक्त व्यापार करार करण्याच्या प्रक्रियेत असून त्यामुळं भारतीय स्टीलच्या निर्यातीला चालना मिळेल,असंही गोयल यांनी सांगितलं. गेल्या गुरुवारपासून मुंबईत सुरु असलेल्या या परिषदेला रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दूरस्थ पद्धतीनं संबोधित केलं. गेल्या दहा वर्षात पायाभूत सुविधा आणि कारखानदारीला केंद्रसरकारनं चालना दिल्यामुळे भारतीय रेल्वेमध्ये पोलादाची मागणी अनेक पटीनं वाढली आहे, असं त्यांनी सांगितलं. उद्योगांनी त्यांच्या गरजा सांगितल्या, तर त्या अधिक चांगल्या प्रकारे पूर्ण करण्याच्या दृष्टीनं आम्हाला उत्पादन करता येईल, असं ते म्हणाले.

**चाचणी**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओनं एक हजार सेकंदांपेक्षा जास्त काळ सक्रिय कूल्ड स्क्रॅमजेट ग्राऊंड टेस्टिंग करून स्क्रॅमजेट इंजिन विकासकामामध्ये महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. डीआरडीओच्या हैदराबाद इथं असलेल्या संरक्षण संशोधन आणि विकास प्रयोगशाळेनं काल नव्याने बांधण्यात आलेल्या अत्याधुनिक स्क्रॅमजेट कनेक्ट टेस्ट फॅसिलिटीमध्ये जमिनीवर चाचणी घेतली. जानेवारीत 120 सेकंदांची चाचणी घेण्यात आली होती, त्याप्रमाणेच ही चाचणी करण्यात आली आहे. या यशस्वी चाचणीमुळे ही यंत्रणा लवकरच पूर्ण क्षमतेने उड्डाण क्षमतेच्या चाचणीसाठी सज्ज होणार आहे.हायपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्र हा शस्त्रांचा एक वेगळा प्रकार असून तो दीर्घकाळ ध्वनीच्या वेगाच्या पाचपट जास्त प्रवास करू शकतो.

**शिर्डी विमानतळ**

नाशिकमधील त्र्यंबकेश्वर इथं होणाऱ्या आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी विमानतळावर दोन हेलिपॅड आणि 8 वाहनतळ उभारायला तसंच विमानतळाचं विस्तारीकरण, अद्ययावतीकरण करण्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या बैठकीत काल मान्यता दिली. प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची 91वी बैठक काल सह्याद्री अतिथीगृहातील सभागृहात झाली. यावेळी राज्यातल्या विविध विमानतळाच्या कामाचाही आढावा घेण्यात आला.

**न्यायालय-राहुल**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याबद्दल कुठलंही अवमानकारक वक्तव्य करु नका, अशी ताकीद सर्वोच्च न्यायालयानं विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना दिली आहे. नोव्हेंबर 2022 मध्ये भारत जोडो यात्रेदरम्यान महाराष्ट्रातील अकोला इथं झालेल्या सभेत त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. त्यासंदर्भात न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि मनमोहन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. यापुढे स्वातंत्र्य सैनिकांबद्दल अशाप्रकारची वक्तव्य केली तर न्यायालय स्वतःहून

कारवाई करेल, अशा इशाराही खंडपीठानं दिला. यापुढे अशी वक्तव्य करणार नाही, असं आश्वासन राहुल गांधी यांचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी न्यायालयाला दिलं. त्यानंतर न्यायालयानं गांधी यांना बजावलेल्या समन्सला स्थगिती दिली.

**<u>कस्तूरीरंगन निधन</u>**

इस्त्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष डॉक्टर कृष्णस्वामी कस्तुरीरंगन यांचं काल बंगळुरू इथं त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते 84 वर्षांचे होते. त्यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या तिन्ही नागरी सन्मानांनी गौरवण्यात आलं होतं. ते 1994 पासून 2003 पर्यंत इस्त्रोचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. कस्तुरीरंगन यांनी पीएसएलव्हीच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या कार्यकाळात चांद्रयानासारख्या मोठ्या मोहिमांचं नियोजन करण्याची सुरुवात झाली होती. निवृत्तीनंतर त्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे कुलपती आणि कर्नाटक ज्ञान आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिलं. 1971 मध्ये अहमदाबाद इथल्या भौतिक संशोधन प्रयोगशाळेत काम करताना प्रायोगिक उच्चऊर्जा खगोलशास्त्र या विषयात त्यांनी डॉक्टरेट मिळवली होती. डॉ. कस्तुरीरंगन यांनी इस्त्रोचे प्रमुख म्हणून भारताच्या अंतराळ कार्यक्रमाच्या उत्क्रांतीत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार करण्यासाठी जे काम केलं, ते पुढच्या पिढीच्या जडणघडणीसाठी उपयुक्त ठरत असल्याची भावना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही कस्तुरीरंगन यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<u>अंत्यसंस्कार</u>**

पोप फ्रान्सिस यांच्यावर आज रोममध्ये अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर आज देशभरात दुखवटा पाळण्यात येणार आहे. यावेळी प्रथमच पोप यांचे अंत्यसंस्कार व्हॅटिकन सिटीच्या बाहेर करण्यात येत आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यासाठी व्हॅटिकन सिटीमध्ये पोहोचल्या आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू आणि गोव्याचे मंत्री रॉड्रीक डिसूझा त्यांच्याबरोबर गेले आहेत.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट मध्ये काल चेन्नई इथं झालेल्या सामन्यात सनराईजर्स हैदराबाद या संघानं यजमान चेन्नई सुपर किंग्स संघाला 5 गडी राखून पराभूत केलं. चिदंबरम क्रीडा संकुलात हा सामना पार पडला. सनराईजर्स हैदराबाद संघानं 18 षटक आणि चार चेंडूत 155 धावांचं लक्ष गाठलं. ईशान किशन ने 34 चेंडूत 44 धावा करत तर हर्षल पटेल ने 4 गडी बाद करत संघाच्या विजायमध्ये मोठा वाटा उचलला. आज संध्याकाळी कलकत्ता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्स या संघांमध्ये कलकत्ता इथल्या इडन गार्डन मैदानावर सामना रंगणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.